जाहिरात क्र.५८४/२०१६. दि.२५/६/१६

## जिल्हा परिषद अहमदनगर
## शिक्षण विभाग (प्राथ.)
## (शालेय पोषण आहार योजना- कंत्राटी पध्दतीने डाटा एंट्री ऑपरेटर पदभरती)

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या अधिपत्याखाली मुख्यालय व तालुका स्तरावर डाटा एंट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील ११ महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणा-या पात्र उमेदवारांचे अर्ज Chanakya Software Services Pvt. Ltd. Pune यांच्या मार्फत विहित नमुन्यात खालील कालावधीत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. **(शासकीय सुटटीचे दिवस धरुन)**

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दि. २३/६/२०१६ रोजी स.११.०० पासून | दि. ३०/६/२०१६ सायं ५.३० वा. पर्यंत |

**परीक्षा शुल्क ऑनलाईन चलनाव्दारे बँकेत जमा करण्याचा अंतिम दिनांक १ /७/२०१६ असेल.**
**आरक्षण निहाय भरावयाची पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| प्रवर्ग | SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | ६ | १३ |

**टीप -** पदांचा आढावा व अन्य कारणांमुळे पदसंख्या कमी-जास्त होऊ शकते. तसेच सामाजिक व समांतर आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

सदर भरती प्रक्रीया संदर्भातील सविस्तर जाहीरात http://nagarzp.gov.in व http://exams.chanakyasoft.in/zpanagardeo/ या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तूत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाव्दारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अदययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांवर राहील.

भरती प्रक्रीया/परीक्षा स्थगित करणे किंवा रदद करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण संख्येत वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रीये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबतचा कोणताही दावा अथवा हक्क सांगता येणार नाही.

ठिकाण - अहमदनगर
दिनांक - / /२०१६

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर
10/6/16

**जिल्हा परिषद अहमदनगर**
**शिक्षण विभाग (प्राथ.)**
**(शालेय पोषण आहार योजना- कंत्राटी पध्दतीने डाटा एंट्री ऑपरेटर पदभरती)**
सविस्तर जाहिरात

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या अधिपत्याखाली मुख्यालय व तालुका स्तरावर डाटा एंट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील ११ महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणा-या पात्र उमेदवारांचे अर्ज Chanakya Software Services Pvt. Ltd. Pune यांच्या मार्फत विहित नमुन्यात खालील कालावधीत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. **(शासकीय सुटटीचे दिवस धरुन)**

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दि. २३/६/२०१६ रोजी स.११.०० पासून | दि. ३०/६/२०१६ सायं ५.३० वा. पर्यंत |

**परीक्षा शुल्क ऑनलाईन चलनाव्दारे बँकेत जमा करण्याचा अंतिम दिनांक १/७/२०१६ असेल.**

**आरक्षण निहाय भरावयाची पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| प्रवर्ग | SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | ६ | १३ |

**टीप -** पदांचा आढावा व अन्य कारणांमुळे पदसंख्या कमी-जास्त होऊ शकते. तसेच सामाजिक व समांतर आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

**१. उमेदवाराची अर्हता --**

अ.या योजनेंतर्गत कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या डाटा एंट्री ऑपरेटरसाठी, उमेदवार किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पदवीधर उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

ब.उमेदवारास टंकलेखनाची गती मराठी भाषेसाठी ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी भाषेसाठी किमान ४० शब्द प्रति मिनिट अशी असणे आवश्यक आहे.

क. उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सदर उमेदवार MS-CIT ही परीक्षा किंवा केंद्र शासनाची या संदर्भातील तुल्यबळ संगणकाची परीक्षा उत्तीर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

ड. उमेदवाराचे वय दिनांक १/१/२०१६ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे या दरम्यान असावे.

**अटी व शर्ती ---**

**१. परिश्रमिक (एकत्रित मानधन )--** डाटा एंट्री ऑपरेटर या पदावर नियुक्त करण्यात येणा-या कंत्राटी कर्मचा-यास मासिक एकत्रित ठोक मानधन रु.९६००/- (रुपये नऊ हजार सहाशे मात्र ) एवढे देण्यात येईल. सदर कर्मचा-यास इतर कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

२. शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणा-या उमेदवारास १० वी व १२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची एकत्रित बेरीज करुन त्यामध्ये उमेदवार पदवीधर असल्यास त्यास १० गुण बोनस देऊन उमेदवारांची मंजूर पदांच्या पाचपट गुणानुक्रमे यादी (मेरीट लिस्ट) तयार करणेत येईल.

३.सदर यादीमधील उमेदवारांची मुलाखत, संगणक व टंकलेखन (मराठी -३० व इंग्रजी-४० श.प्र.मि.) प्रात्यक्षिक परीक्षा अशी एकूण ३० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.

४.उपरोक्त २ व ३ मधील गुण एकत्रित करुन गुणानुक्रमे मंजूर पदाएवढी निवड यादी प्रसिध्द केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात डाटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल

५. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डाटा एंट्री ऑपरेटर या कर्मचा-यास करार कालावधीत कंत्राटी सेवेमध्ये ८ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.

६. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याच्या सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येतील.

७. डाटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचा-यास नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत. तसेच करार कालावधीत कंत्राटी सेवेच्या आधारावर त्याला शासकीय सेवेमध्ये नियुक्तीसाठी कोणतेही हक्क असणार नाहीत.

८. संबधित कर्मचा-याविरुध्द शासकीय कामकाजा बाबत तक्रार असल्यास व त्यानुसार दोषी आढळल्यास विहित कालावधीपूर्वीच कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

९. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यास शासन निर्णय दि.१०.२.२०१० मधील परिशिष्ट -अ मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात करारनामा करुन दयावा लागेल. सदर करारनामा संबधित कर्मचा-याने प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कर्मचा-यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा किंवा आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक आहे.

१०.कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डाटा एंट्री ऑपरेटर या कर्मचा-या संबधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती या संदर्भात आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील. शासनाकडे किंवा जिल्हा परिषदेवर कुठल्याही प्रकारे कंत्राटी पद संपुष्टात आल्यानंतर हक्क राहणार नाही अथवा हक्क दाखवता येणार नाही.

११. अर्जासोबत खुल्या प्रवर्गाकरीता राष्ट्रीयकृत बँकेचे रक्कम रु.३००/- व राखीव प्रवर्गाकरीता रक्कम रु.१५०/- परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. विहित चलनाव्दारे विहित कालावधीत भरलेले परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील.

१२. गुणवत्ता यादीतील राखीव प्रवर्गातील पात्र उमेदवारांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीकामी उपलब्ध करुन दयावे लागेल.

१२. **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** संपल्यानंतर भरती प्रक्रीये संदर्भात वेळापत्रक, पुढील सुचना वेळोवेळी उमेदवारास http://nagarzp.gov.in व http://exams.chanakyasoft.in/zpanagardeo/ या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. त्याकरीता उमेदवारांनी वेळोवेळी उपरोक्त संकेतस्थळावर भेट दयावी.

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

स्वाक्षरी/-
अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर